


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक १९८, गुरुवार १८ एप्रिल २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# विखेंच्या बॉडीगार्डकडून लंकेंच्या कार्यकर्त्याला बेदम मारहाण

■ लंके यांच्या रॅलीत सहभागी झाल्याचा राग ■ सोन्याची चेन आणि पैसेही लांबविले ■ पोलीसांकडून फिर्यादीची प्रत देण्यास टाळाटाळ

पाथर्डी : प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे लोकसभा निवडणूकीतील उमेदवार नीलेश लंके यांच्या स्वाभिमान जनसंवाद यात्रेत सहभागी झाल्याच्या रागातून खा. डॉ. सुजय विखे यांचा बॉडीगार्ड गौरव सुधाकर गर्जे याने सहकाऱ्यांच्या मदतीने शहादेव भानुदास पालवे यांना बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे.**

दरम्यान, दि. ५ एप्रिल रोजी ही घटना घडल्यानंतर पोलीस गुन्हा दाखल करून घेण्यास राजी नव्हते. फिर्यादी शहादेव यांनी उपोषणाचा इशारा दिल्यानंतर नगर येथील खाजगी रूग्णालयात उपचार घेत असलेल्या शहादेव यांचा पोलीसांनी जबाब नोंदविला. जबाब नोंदविल्यानंतरही गुन्हा दाखल होत नव्हता. शहादेव यांनी पुन्हा आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर दि. ११ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल केल्यानंतर फिर्यादीस फिर्यादीची प्रत देण्यासही टाळाटाळ करण्यात येत होती. अखेर न्यायालयाकडे मागणी केल्यानंतर न्यायालयाने फिर्यादीची प्रत उपलब्ध करून दिली.

यासंदर्भात शहादेव पालवे यांनी दिलेल्या फिर्यादीत नमुद केले आहे की, दि.५ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास शहादेव हे चिचोंडी येथून नीलेश लंके यांची रॅली संपल्यानंतर दुचाकीवरून शिराळ मार्गे मजले चिंचोली येथे जात असताना शिराळ शिवारातील हॉटेल शिवतेज येथे पिण्याच्या पाण्याची बाटली घेऊन ते पुढे निघाले होते. त्यावेळी पाठीमागून पल्सर मोटारसायकलवरून गौरव सुधाकर गर्जे तसेच ओमीनी गाडीतून रामेश्वर प्रकाश पालवे, ज्ञानेश्वर प्रकाश पालवे, सर्व रा. कोल्हार कोल्हुबाईचे ता. पाथर्डी तसेच इतर दोन अज्ञात इसम हे शहादेव यांच्याजवळ आले.



### गुंडा गर्दी कोण करतंय ?

**नीलेश लंके समर्थकांवर गुंडा गर्दी दहशतीचे आरोप करून विखे पिता-पुत्र नागरीकांची दिशाभुल करीत आहेत. सभेमध्ये अनेक गंभीर गुन्हे दाखल असलेल्या आरोपींना व्यासपीठावर बसवून भाषण करण्यास लावणे, अंगरक्षकामार्फत लंके यांच्या कार्यकर्त्यांना बेदम मारहाण करणे हे निवडणूकीच्या प्रचारादरम्यान पुढे आले आहे. विखे साहेब गुंडा गर्दी, दहशत कोण निर्माण करतंय ?**

**सुवर्णा धाडगे**
**राष्ट्रवादी महिला आघाडी तालुकाध्यक्ष**

गौरव गर्जे याने शहादेव यांच्या दुचाकीस त्याची दुचाकी आडवी लावून ओमीनीमधील इसमांनी जवळ येत गौरव गर्जे याने शिविगाळ करण्यास सुरूवात केली. तु नीलेश लंके याच्या रॅलीत का फिरतोस ? मी विखेचा बॉडीगार्ड आहे हे माहीती नाही का ? असे विचारत हातातीलन गजाने डाव्या बाजूच्या बरगडीवर मारहाण केली. गळयातील एक तोळयाची चेन ओरबडली. त्याच वेळी रामेश्वर प्रकाश पालवे याने डोक्यात दगड मारला आणि खिशातील १७ हजार ७५० रूपयांची रोकड काढून घेतली. इतर दोन अनोळखी इसमांनी पोटात लाथा बुक्क्यांनी, रॉडने मारहाण करीत गौरव गर्जे याने तुला मारून टाकू अशी धमकी दिली. त्यानंतर शिविगाळ करत सर्वजण घटनास्थळावरून निघून गेले.

मारहाणीनंतर जखमी शहादेव यांनी चिचोंडी येथे जाऊन प्राथमिक उपचार घेऊन नगर येथील खाजगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल झाले. शहादेव यांच्या फिर्यादीनंतर सर्व आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पारनेर परिसराला वादळी पावसाने झोडपले

## सुदैवाने मोठे नुकसान नाही, वीज वाहक तारा तुटल्या

**पारनेर,: प्रतिनिधी**

**पारनेर परिसरासह पानोली,वडुले, गोरेगाव ,डिकसळ या गावांना वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने झोडपले.दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास ढगांच्या गडगडाटासह पावसाला सुरुवात झाली.वादळी वाऱ्यामुळे परिसरात काही काळ भयावह परिस्थिती निर्माण झाली होती. सुमारे अर्धा तास पावसाचे थैमान सुरू होते. दरम्यान लोणीहवेली रस्त्यावर तसेच वीज उपकेंद्राजवळ,वरखेडमळा रस्त्यावर वादळी वाऱ्यामुळे वीज वाहक तारा तुटल्या. त्यामुळे सुमारे एक तास वीज पुरवठा खंडित झाला होता.**



■ वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने पारनेरला झोडपले.

पावसामुळे काही ठिकाणी शेतकऱ्यांनी शेतात काढून ठेवलेला उन्हाळी कांदा भिजला. गहू, हरबरा, ज्वारी,तूर या पिकांची सुगी नुकतीच संपली आहे.त्यामुळे काही ठिकाणी धान्य अद्याप उर्वरीत पान ३ वर

# लंके यांच्या लोकप्रियतेची नगर शहरात प्रचिती !

■ शहरातील प्रचारफेरीस नागरीकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद ■ शिवसेना, राष्ट्रवादी, काँग्रेस, आपसह आघाडीच्या पदाधिकाऱ्यांचा सहभाग




नगर : प्रतिनिधी

**नीलेश लंके यांची स्वाभिमान जनसंवाद यात्रा बुधवारी नगर शहरात पोहचल्यानंतर काढण्यात आलेल्या प्रचार फेरीदरम्यान लंके यांच्या लोकप्रियतेची प्रचिती आल्याचे शिवसेनेचे संभाजी कदम यांनी सांगितले.**

गेल्या १ एप्रिलपासून नीलेश लंके यांनी नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात स्वाभिमान जनसंवाद यात्रा सुरू केली असून बुधवारी ही यात्रा नगर शहरात पोहचली.

प्रचार फेरीदरम्यान बोलताना शिवसेनेचे शहरप्रमुख संभाजी कदम म्हणाले, महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचार फेरीस शहरातील जनतेचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. हा प्रतिसाद पाहता त्यांच्या लोकप्रियतेची प्रचिती येते. नगर शहरातून त्यांच्या विजयासाठी शिवसेना प्रयत्नशील असून शहरातून लंके यांना जास्तीत जास्त मताधिक्य मिळवून दिले जाणार आहे. नगर शहराया विकासासाठी लंके हे खासदार होणे गरजेचे आहे. मतदारांनी त्यांना उत्स्फुर्त मतदान करावे असे आवाहन कदम यांनी केले.

माजी महापौर अभिषेक कळमकर म्हणाले, नगर शहरात आज अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. सध्याच्या खासदाराने काहीही कामे केली नसल्याने आपणास काम करणारा खासदार दिल्लीला पाठवायचा आहे. नीलेश लंके यांनी आपल्या आमदारकीच्या उर्वरीत पान ३ वर

# रामकथा त्याग आणि समर्पण शिकविते

■ भास्करगिरी महाराज यांचे प्रतिपादन ■ हिवरेबाजार येथे श्रीराम कथा निरूपण सप्ताह




■ आदर्शगांव हिवरे बाजार येथे प्रभू श्रीराम मूर्ती स्थापनेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या श्रीराम कथा निरूपण सप्ताहास भास्करगिरी महाराज यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला.

हिवरे बाजार : प्रतिनिधी

**विश्वामध्ये राहणारे स्त्री-पुरूष, सर्व जाती-धर्मातील बांधव हे केवळ मानवतेच्या नात्यामध्ये कसे गुंफता येतील याची प्रेरणा मिळतानाच रामकथा आपल्याला त्याग आणि समर्पण शिकविते असे प्रतिपादन भास्करगिरी महाराज यांनी केले.**

आदर्शगांव हिवरे बाजार येथे प्रभू श्रीराम मूर्ती स्थापनेनिमित्त श्रीराम कथा निरूपण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून भास्करगिरी महाराजांच्या हस्ते सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

भास्करगिरी महाराज म्हणाले, राम कथेमुळे माणसाच्या अंतःकरणात खऱ्या अर्थाने माणूसकी रूजते. घर, गल्ली, देशापुरती भावना न राहता संपूर्ण विश्वाचे कलयाण कसे करता येईल याची प्रेरणा कथेमधून मिळते. हिवरे बाजार येथील रामकथा मंगलमय वातावरणात पार पडत असून कथा श्रवणातून नव्या पिढीला हे क्षण सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावे असे वाटतील असे गौरवोद्गार भास्करगिरी यांनी काढले.

भास्करगिरी महाराज पुढे म्हणाले, वडिलांचे इच्छा हाच आदेश माणून प्रभू श्रीरामचंद्र यांनी सिंहासनाचा त्याग करून वनवासाचा मार्ग स्विकारला. दीन दुबे व आदिवासी बांधवांना जवळ केले. वानरसेना उभी करून रावणाचा नाश केला. श्रीराम चरित्रातून शौर्यासह त्याग व समर्पणाचा आदर्श घेतला पाहिजे.

### हजारे, पवार जिल्ह्याचे वैभव

**प्रत्यक्ष संसदेमध्ये व विधानसभेमध्ये केलेल्या कायद्याची अंमलबजावणी गावामध्ये प्रभावीपणे झाली तरच गावात रामराज्य येऊ शकते. ग्रामराज्यातील रामराज्य याचे मुळ सुत्र आहे म्हणूनच हिवरे बाजार मधील ग्राम राज्य हे दिशादर्शक आहे. ग्रामसंसदेचा अधिकारी सर्वात महत्वाचा आहे. हे समाजात आपल्या कृतीशील कामातून रूजविणारे अण्णा हजारे व पोपटराव पवार हे आपल्या जिल्हयाचे वैभव आहे. या दोघांमुळे आपल्या जिल्याचे नाव जगात पोहचले. आपण जवळ राहतो. परंतू आपण ज्यावेळी दुर जातो त्यावेळी लक्षात येते की आदर्श गांव आणि समाजासाठी काम करणाऱ्या व्यक्तींचे लोक किती कौतुक करतात हे मी अनुभवले असल्याचे भास्करगिरी यांनी आवर्जुन सांगितले. यावेळी आळंदी देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर वीर, प्रसिध्दीप्रमुख उमेश महाराज, अमित महाराज धाडगे, समाधान महाराज शर्मा, योगी निरंजननाथ शांतीनाथ महाराज, पद्मश्री पोपटराव पवार, सरपंच विमल ठाणगे, चेअरमन छबुराव ठाणगे तसेच ग्रामस्थ उपिस्थत होते.**

स्वराज्य निर्माण करणे म्हणजे सोन्याचे रस्ते निर्माण करायचे नाहीत तर समाजाच्या जीवनाचा स्तर उंचावणे हे महत्वाचे कार्य आहे. राष्ट्राची निर्मीती सर्व जाती धर्मातील गरीबांचा जीवनस्तर उंचावण्यासाठी केलेली आहे.

# रांजणगाव मशीद येथील दरोड्यातील सहा आरोपी गजाआड

■ एलसीबी व सुपा पोलीसांची कारवाई ■ दोन लाख ६८ हजारांचा मुद्देमाल हस्तगत



पारनेर : प्रतिनिधी

**तालुक्यातील रांजणगाव मशीद येथील दरोडा प्रकरणातील सहा आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेचे पथक व सुपा पोलिसांनी काल (मंगळवारी) जेरबंद केले. जेरबंद आरोपींकडून दोन लाख ६८ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल पथकाने हस्तगत केला. पारनेरच्या न्यायालयाने आरोपींना २० एप्रिल पर्यंत कोठडी दिली.**

रमेश सीताराम भोसले (वय ३०), दिनेश वतऱ्याब भोसले (वय ३३), सागर पानतास भोसले (वय २२), शशिकांत सीताराम भोसले (वय २४), वसीम वतऱ्याब भोसले (वय १९), राहुल रवी भोसले (वय २४, सर्व रा. विठ्ठलवाडी रस्ता, कामरगाव, ता. नगर) अशी जेरबंद आरोपींची नावे आहेत. रांजणगाव मशीद येथील वसंत जवक हे त्यांच्या कुटुंबियांसह सोमवारी (ता. १५) घरात झोपले असताना अनोळखी सहा जण खोलीच्या दरवाजाची कडी उघडून आत आले. त्यांनी फिर्यादीसह कुटुंबियांना लाकडी दांडके व कोयत्याने मारहाण करत जखमी केले. तसेच सोन्याचे दागिने, रोख रक्कम व इतर घरगुती साहित्य असा दोन लाख ४८ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. या बाबत जवक यांनी सुपा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

त्यानुसार पोलिसांनी दरोड्याचा गुन्हा दाखल करून घेतला होता.

या प्रकरणाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला होता. जवक कुटुंबियांनी केलेले वर्णन, गुन्ह्याची पद्धती व गेलेला माल या आधारावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रेकॉर्डवरील गुन्हेगार तपासले. याच वेळी पथकाला माहिती मिळाली की, हा गुन्हा रमेश भोसले व त्याच्या साथीदारांनी केला आहे.


हे आरोपी कामरगाव शिवारातील एका हॉटेलमध्ये येणार आहेत. त्यानुसार पथकाने सुपा पोलिसांसह जाऊन आरोपींना जेरबंद केले. यावेळी त्यांचा साथीदार पायल काळे (रा. भोरवाडी, ता. नगर) हा पसार झाला. जेरबंद उर्वरीत पान ३ वर

Sanskar Pratishthan's

**DBM English Medium School** STATE BOARD

**DBM International School** CBSE PATTERN

**REQUIRED TEACHERS 2024-25**



We are looking for **Passionate experienced / Fresher, innovative and qualified teachers** with good communication skills and fluency in English for following Classes.

| Sr.No. | Subject | Qualification | No. of Post |
|---|---|---|---|
| 1 | Pre- Primary | H.S.C./ Graduate/ D.Ted | 5 |
| 2 | Primary | H.S.C./ Graduate/ D.Ted / B.Ed. | 4 |
| 3 | Math's | B.sc/ M.sc/ B.Ed. | 2 |
| 4 | Science | B.sc/ M.Sc. B.Ed. | 2 |
| 5 | STT | B.A./M.A. B.Ed / ( His/ Geo) | 1 |
| 6 | English | B.A./M.A. B.Ed | 1 |
| 7 | Marathi | B.A./M.A. B.Ed | 1 |
| 8 | Hindi | B.A./M.A. B.Ed | 1 |
| 9 | Art Teacher (Drawing) | Diploma ATD | 1 |
| 10 | Administrative Staff | Computer Knowledge | 1 |

**Walk – in Interview with all original documents On Thursday 25 April 2024, 10.00 AM to 3.00 PM at Above Address**

Note: *Salary commensurate based on Skill, qualification and Experience.
* Bus Facility will be provided.
* Training will be provided to fresher candidate who are passionate about Education.

**A/P-Ralegan Siddhi,Tal.Parner,Dist.Ahmednagar**
**P.H. 7666120168,9422755191,7083758198**

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार

# उन्हाळी कांदा पिकाची काढणी



**कांदा पिकाच्या दर्जेदार उत्पादनासाठी जमिनीची निवड, योग्य जातींची निवड, दर्जेदार बियाणे, निरोगी रोपे, अन्नद्रव्य व पाणी व्यवस्थापन, आंतरमशागत, कीड-रोग व्यवस्थापन आदी बाबींइतकेच कांदा पिकाची योग्य परिपक्वतेला काढणी करणे व योग्य प्रकारे साठवणूक करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. योग्य परिपक्तेला काढणी करून उत्तम साठवणूक केल्यास उन्हाळी कांद्याची साठवण रांगडा कांद्याच्या तुलनेमध्ये दीर्घकाळ करणे शक्य होते. यामुळे स्थानिक बाजारपेठेत दराची स्थिरता मिळवणे शक्य होते. त्याचप्रमाणे निर्यातीसाठी कांद्याची उपलब्धता वाढवता येते. अधिक काळ साठवणीमुळे बाजारभावानुसार टप्प्याटप्प्याने कांदा विक्री करणे शक्य होते.**



## साठवणुकीसाठी काढणीपूर्वी नियोजन

खरिपात तयार होणाऱ्या जातींचा कांदा एक महिन्यापेक्षा जास्त टिकत नाही. रब्बी हंगामात तयार होणाऱ्या जातींचे कांदे योग्य पद्धतीने साठविल्यास जातिपरत्वे पाच महिने टिकतात. एन २-४-१, ॲग्रिफाउंड लाइट रेड किंवा अर्का निकेतन या जाती साठवणीत विशेष घट न होता सहा महिने टिकू शकतात. भीमा किरण, भीमा शक्ती या नवीन जातीदेखील साठवणीत चांगल्या टिकतात. लागवडीसाठी योग्य जातींची निवड त्यामुळेच महत्त्वाची ठरते.

## खते अन् पाणी नियोजन...

- लागवडीआधी माती परीक्षण करणे महत्त्वाचे आहे. त्यानुसार मुख्य व सूक्ष्मअन्नद्रव्ये यांचे व्यवस्थापन करावे. खतांची मात्रा, प्रकार आणि पाणी नियोजन यांचा साठवणीवर खूप परिणाम होतो. सर्व नत्रयुक्त खते लागवडीनंतर ६० दिवसांच्या आत द्यावीत. उशिरा नत्र दिल्यास माना जाड होतात व कांदा टिकत नाही. पालाशमुळे साठवणक्षमता वाढते.
- गंधकासाठी अमोनिअम सल्फेट, सल्फेट ऑफ पोटॅश किंवा सुपर फॉस्फेटचा वापर केला, तर गंधकाची गरज आपोआप पूर्ण केली जाते. अलीकडे संयुक्त दाणेदार खतांचा वापर होत असल्यामुळे त्यातून फक्त नत्र, स्फुरद व पालाश हीच अन्नद्रव्ये मिळतात. गंधकयुक्त खत लागवडीपूर्वी देणे हे साठवण चांगली होण्यासाठी आवश्यक आहे.
- पाणी देण्याची पद्धत, पाण्याचे प्रमाण याचा परिणाम साठवणीवर होत असतो. कांदा पिकाला पाणी कमी; परंतु नियमित लागते. कांदा पोसत असताना एकाच वेळी भरपूर पाणी दिले तर माना जाड होतात. जोड कांद्याचे प्रमाण वाढते. पाणी अधिक वेळा विभागून देण्यासाठी ठिबक किंवा तुषार सिंचन फायदेशीर ठरते. काढणीअगोदर जमिनीच्या प्रकारानुसार २ ते ३ आठवडे पाणी बंद करावे. त्यानंतर पात पिवळी पडून कांद्याच्या ५० ते ७० टक्के माना पडल्यानंतर काढणी करावी.



## साठवणुकीसाठीचे नियोजन

कांदा सुकवणे : काढणीनंतर कांदा शेतातच पातीसह सुकू द्यावा. कांद्याच्या ओळी अशा तऱ्हेने लावाव्यात, की जेणेकरून पहिल्या ओळीतील कांदा दुसऱ्या ओळीतील पातीने झाकला जाईल. अशा प्रकारे कांदा शेतात चार दिवस सुकू द्यावा. त्यानंतर चार सें. मी. लांब मान ठेवून पात कापावी. चिंगळी, जोड कांदा व डेंगळे आलेले व खराब कांदे वेगळे काढावेत. राहिलेला कांदा सावलीत ढीग करून १५ दिवस सुकवावा. या काळात कांद्याच्या माना वाळून पिरगळतात, वरचा पापुद्रा वाळून कांद्याला घट्ट चिकटतो. अशा प्रकारे वाळलेला कांदा अधिक काळ चांगला टिकतो. बऱ्याच वेळा शेतकरी कांदा काढला की कापून लगेच ढीग लावतात. ओल्या पानांनी ढीग झाकतात. मात्र कांदा काढून तो पानासहित वाळवला तर पानातील ॲबसेसिक ॲसिड पानातून कांद्यामध्ये उतरते. त्यामुळे कांद्यास सुप्तावस्था प्राप्त होते. त्यामुळे कांदे चांगले टिकतात.

साठवणगृहातील वातावरण : चांगल्या साठवणीसाठी साठवण गृहात ६५ ते ७० टक्के आर्द्रता, तापमान २५ ते ३० अंश सेल्सिअसच्या दरम्यान असावे लागते. नैसर्गिक वायुविजनाचा वापर करून साठवणगृहाची रचना केली तर तापमान व आर्द्रता काही अंशी मर्यादित ठेवून साठवणीतील नुकसान कमी करता येते.

साठवलेल्या कांद्याची उंची व रुंदी : चाळीतील कांद्याची उंची ४ ते ५ फुटांपेक्षा जास्त असू नये. उंची वाढल्यामुळे तळातील कांद्यावर वजन वाढते. हवा खेळती राहत नाही. पाखीची रुंदीदेखील ४ ते ४.५ फुटांपेक्षा जास्त असू नये. रुंदी वाढवली तर वायुविजन नीट होत नाही. थरातील मध्यावरील कांदे सडतात. कांदा साठविण्याआधी एक दिवस अगोदर चाळीत बुरशीनाशकाची फवारणी करून निर्जंतुक करावी. कांदे साठवणीसाठी टाकताना जास्त उंचावरून टाकू नये. पावसाळ्यात बाजूने कांदे ओले होणार नाहीत, याची काळजी घ्यावी.

## साठवणगृहाची रचना

साठवणगृहाचे दोन प्रकार असतात. नैसर्गिक वायुविजनाचा वापर करून उभारलेले साठवणगृह आणि विद्युत ऊर्जेचा वापर करून बनवलेली शीतगृहे. नैसर्गिक वायुविजनावर आधारित चाळ ही एक पाखी आणि दोन पाखी या दोन प्रकारची असतात. एक पाखी चाळीची उभारणी दक्षिण-उत्तर करावी. दोन पाखी चाळीची उभारणी पूर्व-पश्चिम करावी. चाळीची लांबी ५० फुटांपेक्षा जास्त असू नये. तळाशी हवा खेळती असावी, तसेच बाजूच्या भिंतीदेखील लाकडाच्या किंवा बांबूच्या असाव्यात. त्यास फटी असाव्यात. चाळीसाठी उंचावरची व पाणी न साठणारी जागा निवडावी. चाळीभोवतीची जागा स्वच्छ असावी. तळाशी मुरूम, वाळूचा थर द्यावा. त्यानंतर चाळीची उभारणी करावी. तळाशी एक फुटाची मोकळी जागा ठेवावी. मेंट किंवा पन्हाळी पत्र्यांनी चाळीत उष्णता वाढते. सिमेंट पत्रे व त्यावर उसाच्या पाचटाचे आच्छादन केले तर तापमान कमी राहण्यास मदत होते. चाळीचे छप्पर उतरते असावे. ते उभ्या भिंतीच्या तीन फूट पुढे असावे, त्यामुळे पावसाचे ओसाडे कांद्यापर्यंत पोहोचत नाहीत, कांदा खराब होणार नाही.

# हरितगृहातील गुलाबावरील फुलकिड्यांचे व्यवस्थापन

**अलीकडे गुलाबावरील विविध किडींपैकी फुलकिडे (थ्रीप्स) ही महत्त्वाची कीड ठरू लागली आहे. या रसशोषक किडीमुळे फुलांचे उत्पादन आणि दर्जावर विपरीत परिणाम होतो. पारंपरिक गुलाब शेतीसोबत हरितगृहातील संरक्षित शेतीमध्येही त्यांचा धोका वाढला आहे. ही कीड वनस्पतींच्या कोवळी पाने, फुलांच्या कळ्या, दांडे यांचे गंभीर नुकसान करते. परिणामी, जगभरातील फूल उत्पादकांना मोठा फटका बसतो.**



## फ्लॉवर थ्रीप्स

- शास्त्रीय नाव : फ्रॅंक्लिनिएला ऑक्सीडेंटलिस (पेरगांडे)
- हंगामानुसार फुलकिडीचा प्रादुर्भाव : फुलकिडींचा प्रादुर्भाव वर्षभर आढळतो. फुलकिडे वर्षभर नवीन कोवळ्या पानांचे व फुलांचे नुकसान करीत असतात. फुलकिड्यांची सर्वाधिक संख्या नोव्हेंबर-डिसेंबर आणि एप्रिल -मे महिन्यात आढळते. तापमान आणि आर्द्रतेचा परिणाम फुलकिडींच्या संख्येवर होतो. या महिन्यात कमाल तापमान ३० ते ३३ अंश सेल्सिअस, किमान तापमान १० ते १५ अंश सेल्सिअस तापमान आणि ६० ते ७० टक्के आर्द्रता असते. अशा कालावधीत फुलकिड्यांचे प्रमाण वाढते.



- वर्णन आणि जीवन चक्र : फुलकिड्याचे प्रौढ सामान्यतः एक ते दोन मि.मी. लांब असून, आकाराने लहान असतात. अंडी ते प्रौढ जीवन अवस्था पूर्ण होण्यासाठी दोन ते तीन आठवडे लागतात. तथापि, अंड्यापासून प्रौढ होईपर्यंतचा काळ तापमानावर अवलंबून असतो. तापमान २६ ते २९ अंश सेल्सिअस (७९ आणि ८४ अंश फॅरनहिट) दरम्यान असताना जीवनचक्र सात ते १३ दिवसांत पूर्ण होऊ शकते. मादी ४५ दिवस जगते. आयुष्यकाळामध्ये १५० ते ३०० अंडी घालते.



- अंडी अवस्था : अंडी दोन ते साडेचार दिवसांत उबतात.
- अळी अवस्था : यात दोन टप्पे असतात.
- पहिली अळी अवस्था : लहान आणि पांढरी असते. एक-दोन दिवसांत मोठी होते.
- दुसरी अळी अवस्था : ही अळी कोवळी पाने व फुलांचे रस शोषून घेतात. ते विकसित होत असलेल्या पर्णसंभाराखाली किंवा फुलांच्या पाकळ्या जोडणीच्या ठिकाणी आढळतात.
- कोष अवस्था : कोषावस्थेमध्येही विकासाचे दोन टप्पे असतात.
- पहिला टप्पा : पूर्व कोषावस्था (प्रीप्युपा अवस्था)
- दुसरा टप्पा : कोषावस्था (प्युपा अवस्था)
- काही प्रजाती मातीत सुप्त अवस्थेत जातात, तर काही प्रजाती पानांवरच सुप्त अवस्थेत जातात. पूर्व कोषावस्थेचा कालावधी ८-१० दिवसांचा असतो आणि सुप्त कालावधी २-४ दिवस असतो. पाक जीवन चक्र सुमारे १२ ते २० दिवसांत पूर्ण होते.
- प्रौढ अवस्था : साधारण सहा दिवसांनी सुप्त अवस्थेतून प्रौढ थ्रीप्स बाहेर पडतो. प्रौढांना पंख असले तरी ते नीट उडता येत नाही. हरितगृहातील पंखे आणि बाह्य वायूझोतांबरोबर संपूर्ण हरितगृहामध्ये पसरतात. प्रौढ फुलकिडे काही विशिष्ट रंग (पिवळा, निळा आणि पांढरा) आणि वनस्पतींच्या हालचालींकडे आकर्षित होतात.

## नुकसानीचा प्रकार...

अप्सरा आणि प्रौढ या दोन्ही हानीकारक अवस्था आहेत. कोवळी पाने आणि फुलांच्या पृष्ठभागावर इजा करून त्यातील स्त्रवणारा रस शोषतात. सुरुवातीच्या लक्षणांमध्ये कोवळ्या पानांवर व फुलांवर लाल, तपकिरी डाग किंवा रेषा दिसतात. पुढे प्रभावित कोवळी पाने वरच्या दिशेने वळतात. जुनी झाल्यावर वेडीवाकडी होतात. फुलकळीच्या सुरुवातीच्या अवस्थेत प्रादुर्भाव झाल्यास कळ्यावर डाग पडतात. विशेषतः बाह्य सेपल्स पाकळ्या विकृत होतात. कळ्या अर्धवट उघडतात किंवा वेळेपूर्वी बंद होतात. फुलांच्या पाकळ्यांवर चांदीसारख्या पांढऱ्या किंवा तपकिरी रेषा पडून फुले खराब होतात. प्रभावित फुलांच्या पाकळ्या उलगडून पाहिल्यास फुलकिड्यांच्या विविध अवस्था मोठ्या संख्येने दिसतात.

## सर्वेक्षण अन् निरीक्षण

- थ्रीप्सचा प्रादुर्भाव वेळीच लक्षात येण्यासाठी आणि व्यवस्थापनासाठी नियमित सर्वेक्षण केले पाहिजे. त्यासाठी हरितगृहामध्ये झाडाजवळ प्रति १००० वर्गमीटरमध्ये १०-१५ पिवळे/ निळे चिकट सापळे लावावेत.
- प्रति चिकट सापळा पाचपेक्षा अधिक फूलकिडे आठवड्याला आढळल्यास फवारणीचे नियोजन करावे.
- आठवड्यातून १-२ वेळा प्रत्यक्ष पाहणीही करत राहावी. त्यासाठी फुले स्वच्छ पांढऱ्या कागदावर हलक्या हाताने झटकावी. कागदावर ते स्पष्ट दिसून येतात.
- फुले असलेल्या गुलाब झाडांकडे थ्रीप्स लवकर आकर्षित होतात. उमललेली फुले वेळीच पिंच करून घ्यावी. (उदा. उमललेली पिवळी व पांढरी फुले)

## मशागतीय नियंत्रण

रोपे आणून लावण्यापूर्वी हरितगृह व आजूबाजूच्या परिसरातील तणे काढून घेतल्याची खात्री करावी. पुढे नियमित अंतराने तणनियंत्रण करून साफसफाई करावी. थ्रीप्सच्या प्रादुर्भावाचे स्त्रोत नष्ट करण्यासाठी हरितगृहात स्वच्छता राखावी.



## यामुळे वाढतो फुलकिडीचा प्रादुर्भाव

- ज्या वनस्पतीमध्ये कर्बोदके, प्रथिने, स्टेरॉल्स आणि जीवनसत्त्वे अशा पोषक तत्त्वे अधिक असतात. त्यावर फुलकिडीच्या वाढीचा दर अधिक असतो. नवीन फुलकिड्यामुळे पुनरुत्पादन क्षमता वाढते.
- वनस्पतीमध्ये अमिनो ॲसिड आणि प्रथिने मुबलक असल्यासही फुलकिडे वाढीस पोषक वातावरण तयार होते. अशा झाडावर फुलकिडीची मादी अधिक अंडी घालते.
- वनस्पतीमध्ये नत्राचे प्रमाण अधिक असल्यास त्यावर फुलकिडींचा अधिक हल्ला होतो.
- मादी सामान्यतः पानांच्या पृष्ठभागाच्या खाली किंवा फुलांच्या पाकळ्यांमध्ये आतील भागात अंडी घालते. स्पर्शजन्य कीटकनाशकांची फवारणी पोहोचू शकत नाही. यामुळे फुलकिडींची संख्या वाढते.

## जैविक नियंत्रण

जैविक नियंत्रणासाठी भक्षक फायटोसाइड माइट्स, ॲम्बलिसीयस कुकुमेरिस आणि ए. स्विस्क हे कोळी १ ते ५ प्रति रोप प्रमाणात उपयोगी ठरतात. लेकॅनिसिलियम लेकॅनी किंवा बिव्हेरिया बॅसियाना या जैविक कीडनाशकाची ५ मि.लि. किंवा ५ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. विशेषतः २० ते २५ अंश सेल्सिअस तापमान आणि ८० टक्क्यांपेक्षा जास्त सापेक्ष आर्द्रता अशा थंड आणि दमट हवामानात जैविक कीडनाशकाच्या फवारणीची कार्यक्षमता वाढते. किडींचे प्रमाण आटोक्यात ठेवण्यासाठी वनस्पतिजन्य कीडनाशके उपयोगी ठरतात. उदा. निंबोळी फॉर्म्यूलेशन तीव्रतेनुसार, १ टक्का प्रमाणात २.५ मिलि आणि ५ टक्के प्रमाणात ०.५ मिलि प्रति लिटर पाणी. एकरी ६०० ते ८०० लिटर द्रावण वापरावे.

## रासायनिक नियंत्रण

किडीच्या निरीक्षणातून प्रमाण कमी असताना नियंत्रण करण्यासाठी प्रयत्न करावेत. थ्रीप्सचे एका फवारणीद्वारे संपूर्ण नियंत्रण होत नाही. थ्रीप्स आटोक्यात येईपर्यंत पाच दिवसांच्या अंतराने किमान दोन वेळा फवारणी करावी. थ्रीप्स आटोक्यात आल्यानंतर सात ते दहा दिवसांच्या अंतराने पुढील फवारणी करावी. फुलकिड्यांमध्ये कीटकनाशकांप्रति प्रतिकारकता विकसित होऊ नये, यासाठी एकदा वापरलेले कीटकनाशक पुढील किमान चार आठवड्यांपर्यंत वापरू नये. कीटकनाशकांचा आलटून- पालटून वापर करणे फायदेशीर ठरते. फवारणीची कार्यक्षमता जोखण्यासाठी चिकटसापळ्याचे दर आठवड्याला निरीक्षण करत राहावे. त्यात चिकटणाऱ्या फुलकिड्यांची संख्या कमी होत असल्यास आपली फवारणी उपयोगी ठरली, हे लक्षात येते.

## खत व्यवस्थापन

- प्रतिचौरस मीटर क्षेत्रासाठी शेणखत १० किलो या प्रमाणात वापरावे. लागवडीनंतर ३ आठवड्यांनी नत्र ३० ग्रॅम, स्फुरद ३० ग्रॅम व पालाश २० ग्रॅम या प्रमाणात विद्राव्य खतातून ठिबकसंचातून सोडावे. एक महिन्यानंतर पुढील ४ महिने पुढीलप्रमाणे विद्राव्य खते द्यावीत.
- एकात्मिक खत व्यवस्थापन : लागवडीनंतर दरवर्षी प्रतिचौरस मीटर क्षेत्रासाठी शेणखत २ किलो अधिक निंबोळी पेंड २०० ग्रॅम याप्रमाणात द्यावे. तसेच गांडूळ खत ५०० ग्रॅम/ चौ.मी. या प्रमाणात वर्षातून दोन वेळा द्यावे.
- जैविक खते ॲझोस्पिरिलियम अधिक पी.एस.बी. प्रत्येकी २ ग्रॅम/ झाड याप्रमाणात दर दोन महिन्यांनी द्यावे. गांडूळखत ५०० ग्रॅम/ चौ.मी. क्षेत्रास वर्षातून दोन वेळा द्यावे.

| महिना | नत्र (मिलिग्रॅम प्रतिझाड प्रतिआठवडा) | स्फुरद (मिलिग्रॅम प्रतिझाड प्रतिआठवडा) | पालाश (मिलिग्रॅम प्रतिझाड प्रतिआठवडा) |
|---|---|---|---|
| पहिला | १०० | १०० | १०० |
| दुसरा | २०० | २०० | २०० |
| तिसरा | ३०० | २०० | २०० |
| चौथा | ४०० | ३०० | ३०० |

# हरितगृहात गुलाब फुलांचे उत्पादन घेताना...

**बाजारात गुलाब फुलांना वर्षभर मागणी असते. देशांतर्गत तसेच देशाबाहेरील बाजारात दर्जेदार गुलाब फुलांना मागणी वाढत आहे. त्यासाठी हरितगृहातील गुलाब फुलशेती फायदेशीर ठरणार आहे. हरितगृहातील गुलाबशेतीसाठी सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करावा. व्हॅलेंटाइन डे, ख्रिसमस आदी सण तसेच लग्नसमारंभ यांचा विचार करून सप्टेंबर ते फेब्रुवारीदरम्यान बाजारात फुले विक्रीस येतील यादृष्टीने गुलाबाची लागवड करावी. कमीत कमी १० ते २० गुंठे क्षेत्रावरील लागवड फायदेशीर ठरते.**

- जाती : परदेशी बाजारपेठेसाठी : हायब्रीड टी प्रकार - फर्स्ट रेड, पॅशन, अप्पर क्लास, बोर्डो (लाल), टॉपलेस, नोबलेस, व्हिवाल्डी (गुलाबी) पॅरिओ, पॉइझन, टेक्सास, गोल्ड, स्ट्राइक (पिवळा) टिनीके ऍव्हेलांची, स्कायलाइन (फिकट हिरवा - पिवळा) फ्लोरिबंडा प्रकार - गोल्डन गेट (पिवळा), एस्किमो (पांढरा)
- देशांतर्गत बाजारपेठेसाठी : डबल डिलाइट, सुपर स्टार, फेअरी पोर्च, ओक्लाहोमा, लॅंडोरा.
- **हवामान :** फुलांचा रंग, पाकळ्याची संख्या, फुलदांड्याची लांबी याबाबी तापमानावर अवलंबून असतात. योग्य वाढीसाठी कमाल तापमान २० ते २५ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान १६ ते १८ अंश सेल्सिअस इतके असावे. सापेक्ष आर्द्रता ६० ते ७० टक्के असावी. कमी आर्द्रतेमुळे लाल कोळी किडीचा व भुरी रोगाचा प्रादुर्भाव वाढतो. जास्त आर्द्रता व कमी तापमानात बोट्रायटीस व डाउनी मिल्ड्यू या रोगांचा प्रादुर्भाव वाढतो. प्रकाशमान ४००० ते ६००० लक्सदरम्यान असावे. कर्बवायूची पातळी १००० ते ३००० पीपीएम असावी.
- **लागवडीची वेळ :** निर्यातीसाठी गुलाबाची उपलब्धता सप्टेंबरपासून असावी लागते यासाठी मे-जून महिन्यामध्ये लागवड करावी.
- **जमीन व्यवस्थापन :** गादीवाफे बनविण्याआधी सर्व मातीचे निर्जंतुकीकरण करणे आवश्यक असते. त्याकरिता १०० चौ.मी. भागासाठी ७.५ ते १० लिटर फॉर्मेलिन प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून ते १० x १० मीटर क्षेत्रावर झारीच्या साह्याने शिंपडावे. त्यानंतर काळ्या प्लॅस्टिक पेपरने माती सात दिवस हवाबंद अवस्थेत झाकून ठेवावी. त्यानंतर प्रतिचौरस मीटर क्षेत्रासाठी १०० लिटर चांगले पाणी वापरून जमीन फ्लश करून घ्यावी. त्यामुळे जमिनीतील आम्लयुक्त पाण्याचा निचरा होऊन जमीन आम्लविरहित होते. वाफसा आल्यानंतर अपेक्षित मापांप्रमाणे गादी वाफे तयार करून त्यावर रोपांची लागवड करावी. हरितगृहाच्या लांबीप्रमाणे योग्य लांबीचे १ ते १.६ मीटर रुंद व ३० सें.मी. उंचीचे गादीवाफे तयार करावेत. दोन वाफ्यात ५० ते ६० सें. मी. अंतर राखावे. जमीन खडकाळ, मुरमाड किंवा लागवडयोग्य नसल्यास मातीविना माध्यम कोकोपीटचा वापर करावा. कोकोपीटचा वापर केल्यास स्टॅन्ड कुंड्या सिंचन यंत्रणेसाठी अंदाजे ३० टक्के जादा खर्च येतो. परंतु कोकोपीटमधील बुरशीजन्य रोगांचा मुळांना होणारा प्रादुर्भाव टाळता येतो. कोकोपीटमधील गुलाब लागवडीसाठी ३० सें. मी. व्यासाची कुंडी वापरावी. कुंडीचे आकारमान तिच्यात २० लिटर पाणी मावण्याइतके असावे. पाच गुंठ्यांसाठी ३२०० कुंड्या व दोन रोपे प्रतिकुंडी याप्रमाणे लागवड करावी. रोझा इंडिका, रोझा मल्टिफ्लोरा, नेटल ब्रॉयर या तिन्हीपैकी एका खुंटावर डोळे भरलेली, पॉलिबॅगमध्ये वाढविलेली ६ ते ८ महिने वयाची कलमे वापरावीत. साधारणतः ४५x२० सें.मी अंतरावर लागवड करावी. दोन ओळीत ३० ते ४५ सें.मी. व दोन रोपात १५ ते २० सें.मी. अंतर राखावे. प्रतिचौरस मीटर क्षेत्रावर ६ ते ९ रोपे लावावीत.

## शॉर्ट न्यूज

### श्रीरामपूर कल्याण बससेवा सुरू

**श्रीरामपूर :** येथील बसस्थानकावरून श्रीरामपूर ते कल्याण ही बस काल सुरू करण्यात आली आहे. बस दररोज सकाळी सव्वासहा वाजता सुटणार आहे. परतीच्या प्रवासात कल्याणहून दुपारी एक वाजता बस सुटेल. बसचा मार्ग श्रीरामपूर, बाभळेश्वर, लोणी, संगमनेर, आळे फाटा, मुरबाडहून कल्याण असा राहणार आहे. श्रीरामपूर कल्याण बसमुळे प्रवाशांची सोय झाली आहे. कल्याण येथे जाणारा व्यापारी वर्ग मोठ्या प्रमाणात आहेत.

### पंतप्रधानांचे हात बळकट करा

**श्रीगोंदा :** अहमदनगर लोकसभा मतदारस घात खासदार सुजय विखे पाटील मोठ्या मताधिक्क्याने आघाडी घेणार आहेत. त्या अनुषंगाने श्रीगोंद्यामधून एक लाख मतांची आघाडी देण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्यांवर प्रचाराची धुरा आहे. त्यामुळे श्रीगोंदाकरांची जबाबदारी वाढली आहे. असे सांगतानाच खासदार सुजय विखे पाटील यांच्या रूपाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला जिल्हाध्यक्ष अनुराधा नागवडे यांनी केले आहे.

### पोलिस कारवाईनंतरही कोतुळमध्ये मटका सुरूच

**अकोले :** तालुक्यात कोतुळ येथे अवैध धंद्यांचे पेव फुटले आहे. या अवैध दारू आणि मटका याच्या आहारी अनेक तरुण गेले आहे, यामुळे पोलिसांच्या नाकावर ठिचून सुरू असलेल्या मटक्या वर बंदी घालण्याची मोठी जबाबदारी अकोले पोलिसांवर येऊन ठेपली आहे. अकोले पोलीसांनी गुरूवारी अवैध दारू ची वाहतूक करून दोघांनावर काकारवाई केली यात सहा लाखाचा ऐवज जप्त केला, मात्र सुमारे पंधरा दिवसापूर्वी मटका चालविणाऱ्या कोतुळ येथील दोन ठिकाणावर पोलीस कारवाई झाली होती, असे असूनही तो मटका व्यवसाय पुन्हा तेजीत सुरू आहे.

### सुपा गावात पाणपोईची सोय

**सुपा :** सामाजिक कार्यकर्ते किशोर जाधव यांच्या संकल्पनेतून सुपा गावातली मुख्य चौकात वाटसरुसाठी पाणपोई सुरू करण्यात आली आहे. याप्रसंगी सेवा निवृत्ती पोलीस उपनिरिक्षक रावसाहेब भोसले, देवा मोटे, रमिझ शेख, अक्षय जवक, मोहित कोरेकर, वैभव काळे, राहुल थोरात, भाऊ निमसे, गौरव शिंदे, अभी येणारे, श्याम ढगे, शुभम मोकाते, दादा जवक, चैतन्य मगर, सौरभ अवचीते, लोकेश सूर्यवंशी, आतिफ शेख, किरण सूर्यवंशी, तुळशीराम जाधव, राम ढवळे, आदित्य ठोकळ, असिफ शेख, संतोष दळवी, किशोर सोंडकर, ओंकार ढवळे, दीपक शेळके आदी मान्यवर उपस्थित होते.

### कोळगावमध्ये सांडपाणी रस्त्यावर

**कोळगाव :** मधील एसटी बसस्थानक चौकातून माळ गल्लीकडे जाणाऱ्या रस्त्यावर रस्तादुरुस्तीसाठी खोदकाम केल्यामुळे तेथील ड्रेनेजचा पाईप फुटून सांडपाणी रस्त्यावरून वाहत आहे. त्याकडे ग्रामपंचायतीने दुर्लक्ष केल्याने परिसरातील ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. पंधरा दिवसांपूर्वी रस्त्याचे काम सुरू झाले. परंतु तेथील ड्रेनेज पाईप फुटल्याने त्यातील पाणी रस्त्यावर वाहू लागले. रस्ता कामासाठी तेथे मुरूम टाकला होता. त्यामध्ये हे सांडपाणी जमा झाल्याने सर्वत्र चिखल झाला आहे.

# मतदानावर बहिष्कार टाकू नका

## जिल्हाधिकाऱ्यांचे ग्रामस्थांना आवाहन




**पाथर्डी : प्रतिनिधी**

**मागील २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पाथर्डी तालुक्यातील वडगाव ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या ढाकणवाडी गावाने मतदानावर बहिष्कार टाकला होता. त्याची पुन्हा पुनरावृत्ती होणार नाही म्हणून खबरदारीसाठी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. वडगाव गावासाठी रस्ता नसल्याने ग्रामस्थांनी तीव्र स्वरूपाचा पवित्रा घेऊन मतदानावर शंभर टक्के बहिष्कार टाकून एकाही मतदाराने मतदान केले नव्हते. मागील निवडणुकीप्रमाणे या निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकू नये, आपला रस्त्याचा प्रश्न मार्गी लागल आहे. सर्वांनी मतदान करून शंभर टक्के मतदान करून आपला हक्क बजावून लोकशाही अधिक बळकट करा, असे आवाहन देखील करण्यात आले.**

जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्यासह जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, प्रांतधिकारी प्रसाद मते, तहसीलदार उद्धव नाईक, गटविकास अधिकारी शिवाजी कांबळे यांनी ढाकणवाडी गावात जाऊन ग्रामस्थांशी चर्चा केली. यावेळी उपसरपंच रवींद्र ढाकणे, दत्तू ढाकणे, रावसाहेब ढाकणे, सोमा बडे, पंचायत समितीचे अभियंता अनिल सानप, ग्रामसेवक रोहिदास आघाव, तलाठी मनोज खेडकर उपस्थित होते.

ग्रामस्थांचे मनपरिवर्तन करण्यास प्रशासनाला यश आले असून या निवडणुकीत आम्ही मतदान करू, असे मतदार व ग्रामस्थांनी उपस्थित अधिकाऱ्यांना आश्वासित केले. त्यानंतर पाथर्डी तालुक्यात दुष्काळाची परिस्थिती बिकट चालली असून मोठ्या प्रमाणात टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो, त्याच्याही परिस्थितीचा आढावा जिल्हाधिकारी यांनी घेऊन तालुक्यात ज्या ठिकाणी पाण्याचे उद्भव आहेत, त्या ठिकाणाहून टँकर भरण्यासंदर्भात काही सूचना तालुका प्रशासनाला दिल्या.

# लता मंगेशकर पुरस्कार अमिताभ बच्चन यांना जाहीर

## रहमान, अशोक सराफ, पद्मिनी कोल्हापुरे, भाऊ तोरसेकर यांना प्रदीर्घ सेवा पुरस्कार





**मुंबई : प्रतिनिधी**

**मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृति प्रतिष्ठान विश्वस्त संस्थेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांची घोषणा मंगळवारी करण्यात आली. मागील ३४ वर्षांपासून या संस्थेच्या वतीने पुरस्कार प्रदान केले जातात. तर गेल्या तीन वर्षांपासून लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कारानेही मान्यवरांचा गौरव केला जातो. या वर्षी या विशेष पुरस्कारासाठी पद्मविभूषण अमिताभ बच्चन यांची निवड करण्यात आली आहे. पहिल्या वर्षी हा पुरस्कार पंतप्रधान नरेंद्र मोदी तर दुसऱ्या वर्षी आशा भोसले यांना प्रदान करण्यात आला होता. या पुरस्काराचे हे तिसरे वर्ष आहे. त्यासाठी महानायक अमिताभ बच्चन यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.**

**पुरस्कार प्राप्त इतर मान्यवर**

लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार - पद्मविभूषण अमिताभ बच्चन, मास्टर दीनानाथ मंगेशकर पुरस्कार - ए.आर. रहमान (प्रदीर्घ संगीत सेवा),मोहन वाघ पुरस्कार - गालिब नाटक (उत्कृष्ट नाट्यनिर्मिती २०२३-२४),आनंदमयी पुरस्कार (आशा भोसले पुरस्कृत),दीपस्तंभ फाऊंडेशन मनोबल (समाज सेवा) वाग्विलासीनी पुरस्कार - श्रीमती मंजिरी फडके (प्रदीर्घ साहित्य सेवा),मास्टर दीनानाथ मंगेशकर पुरस्कार - अशोक सराफ (प्रदीर्घ नाट्य-चित्रपट सेवा),मास्टर दीनानाथ मंगेशकर पुरस्कार - पद्मिनी कोल्हापुरे (प्रदीर्घ चित्रपट सेवा),मास्टर दीनानाथ मंगेशकर पुरस्कार - रूपकुमार राठोड (प्रदीर्घ संगीत सेवा),मास्टर दीनानाथ मंगेशकर पुरस्कार - भाऊ तोरसेकर (प्रदीर्घ पत्रकारिता),मास्टर दीनानाथ मंगेशकर पुरस्कार - अतुल परचुरे (प्रदीर्घ नाट्य सेवा),मास्टर दीनानाथ मंगेशकर पुरस्कार,(विशेष पुरस्कार) - रणदीप हुडा (उत्कृष्ठ चित्रपट निर्मिती)

**पुरस्कार आणि संस्थेचे कार्य**

ही संस्था मंगेशकर कुटुंबियांनीच स्थापन केली असून त्याचा मुळ उद्देश हा दिवंगत मास्टर दीनानाथ मंगेशकर यांचा स्मृतिदिन दिनांक २४ एप्रिल रोजी प्रतिवर्ष साजरा करणे हा आहे. मंगेशकर प्रतिष्ठान तर्फे दरवर्षी संगीत, नाटक, कला, वैद्यकीय, पत्रकारीता व सामाजिक कार्य क्षेत्रातील दिग्गजांचा सत्कार केला जातो व त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात येतो. आत्तापर्यंत सुमारे २१२ व्यक्तींना गेल्या ३४ वर्षात हे पुरस्कार प्रदान केले आहेत. तसेच या दिवशी पुरस्कार सोहळ्यानंतर संगीत तथा नाट्य, नृत्य असे कलाक्षेत्रातील विविध कार्यक्रम केले जातात. तसेच २०२२ वर्षापासून भारतरत्न लता मंगेशकर यांच्या स्मरणार्थ एक विशेष म्हणजे ''लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार'' प्रदान करण्याचे सर्व विश्वस्तांनी ठरविले आहे. त्यानुसार २४ एप्रिल २०२२ रोजी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना हा पुरस्कार प्रदान केला होता व २४ एप्रिल २०२३ रोजी आशा भोसले यांना हा पुरस्कार दिला होता. हा पुरस्कार दरवर्षी फक्त एकाच अशा व्यक्तीला दिला जातो की ज्याने आपल्या राष्ट्रासाठी, लोकांसाठी आणि समाजासाठी अतुलनीय, नेत्रदीपक आणि अनुकरणीय योगदान दिले आहे.

**२४ एप्रिल रोजी पुरस्कार प्रदान सोहळा**

यंदाचा पुरस्कार प्रदान सोहळा दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह, विलेपार्ले (पु.), मुंबई येथे बुधवार २४ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वा. असेल. वरील सर्व पुरस्कार अध्यक्ष आशा भोसले यांच्या हस्ते प्रदान केले जातील.

**पुरस्कारांसाठी आम्हाला जनतेचे प्रेम आणि पाठिंबा मिळाल्याचा आनंद**

या वेळी हृदयनाथ मंगेशकर म्हणाले की ''मास्टर दीनानाथजींचे गायक, संगीतकार आणि रंगमंच कलाकार म्हणून अतुलनीय योगदान असून महाराष्ट्र आणि भारतातील लोकांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या स्मरणार्थ मंगेशकर परिवार दिग्गजांना सन्मानित करण्यासाठी मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृति प्रतिष्ठान पुरस्कारांचे आयोजन करते. या पुरस्कारांसाठी आम्हाला जनतेचे प्रेम आणि पाठिंबा मिळाल्याचा आनंद आहे.

(पान १ वरून)

### पारनेर परिसराला वादळी पावसाने झोडपले

शेतातच आहे.शेतातील धान्य व शक्य तितका कांदा झाकण्यासाठी शेतकऱ्यांची धांदल उडाली होती.वादळी वाऱ्यामुळे आंब्याचा मोहोर मोठ्या प्रमाणावर गळाला.आज पारनेर बाजार समितीमध्ये कांद्याचे लिलाव होते.लिलावानंतर आडत व्यापाऱ्यांच्या गाळ्यासमोर ठेवलेला कांदा झाकण्यासाठी व्यापाऱ्यांची धावपळ उडाली. सुदैवाने नुकसान झाले नाही.

दरम्यान पाऊस सुरू झाल्यावर वातावरणात निर्माण झालेला गारवा पाऊस उघडल्यावर गायब झाला.दिवसभर कडक उन्हात तापलेल्या जमिनीतून पाऊस उघडल्यावर उष्णता बाहेर पडली,वाराही थांबला.त्यामुळे निर्माण झालेल्या उकाड्याने नागरिक हैराण झाले होते.तालुक्याच्या बहुतांश भागात आज ढगाळ वातावरण होते.दरम्यान दीड तासांच्या विश्रांती नंतर, साडेपाच वाजण्याच्या सुमारास पुन्हा वादळी वाऱ्यासह किरकोळ स्वरूपाच्या पावसाला सुरुवात झाली.त्यामुळे वातावरणात पुन्हा गारवा निर्माण झाला.

### लंके यांच्या लोकप्रियतेची नगर शहरात प्रचिती !

काळात पारनेरमध्ये जी विकास कामे केली त्याच पध्दतीने नगर दक्षिण मतदारसंघातही काम करणारा खासदार झाला पाहिजे. त्यासाठी लंके हेच योग्य उमेदवार असल्याचे कळमकर म्हणाले.

काँग्रेसचे किरण काळे म्हणाले, लोकप्रतिनिधी कसा असावा हे नीलेश लंके यांनी दाखवून दिले आहे. खासदार म्हणून जनतेने त्यांना स्विकारले आहे हे संपुर्ण मतदारसंघातून त्यांना मिळत असलेल्या प्रतिसादावरून दिसत आहे. जनता लंके यांच्या पाठीशी उभी असून प्रचार फेरीस मिळत असलेला प्रतिसाद तेच अधोरेखीत करत आहे. लंके यांच्या विजयासाठी सर्वच पक्ष सरसावले आहे. लंके यांच्या विजयात काँग्रेसचा मोठा वाटा असेल असा विश्वास काळे यांनी व्यक्त केला.

रॅलीचा शुभारंभ दिल्लीगेट येथून होऊन प्रभाग क्र. ८ ते १३ मधील कल्याण रोड, आदर्शनगर, वारूळाचा मारूती, बालिकाश्रम रोड, तोफखाना, बागडपट्टी, सर्जेपुरा, तेलीखुंट, चितळे रोड, नेता सुभाष चौक, चौपाटी कारंजा, नालेगांव, गाडगीळ पटांगण, पटवर्धन चौक, लक्ष्मी कारंजा, नवी पेठ, कापड बाजार, गंज बाजार, दाळ मंडई, मंगल गेट, झेंडी गेट, हातमपुरा, रामचंद्र खुंट, बुरूडगल्ली, माणिक चौक, पंचपीर चावडी, कौठीची तालिम मार्गे माळीवाडा येथे ग्रामदैवत विशाल गणपती मंदिरात सकाळच्या सत्राचा समारोप झाला. प्रचार फेरीदरम्यान नवीपेठ येथील पुरातन श्रीराम मंदिरात लंके व सहकाऱ्यांनी प्रभू श्रीरामाचे दर्शन घेतले. शिवसेना शहरप्रमुख संभाजी कदम, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अभिषेक कळमकर, काँग्रेसचे शहराध्यक्ष किरण काळे, आपचे भरत खाकाळ, युवा सेनेचे विक्रम राठोड, माजी महापौर भगवान फुलसौंदर, अशोकराव बाबर, संजय शेंडगे, नलिनी गायकवाड, आशा निंबाळकर, संजय झिंजे, गणेश कवडे, बाळासाहेब बोराटे, दत्ता जाधव, सुरेश तिवारी, गिरीष जाधव यांच्यासह महाविकास आघाडीचे सर्व नगरसेवक, पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

### रांजणगाव मशीद येथील दरोड्यातील सहा आरोपी गजाआड

आरोपींकडून पथकाने दोन लाख ६८ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल पथकाने हस्तगत केला. यात १५ ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र,५ ग्रॅम वजनाचे डोरले, २४ हजार ५०० रुपये रोख, एक दुचाकी, दोन लोखंडी कत्ती, एक तलवार याचा समावेश आहे. पथकाने जेरबंद आरोपींना पुढील तपासासाठी सुपा पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.









# उष्णतेचा तडाखा, ढगाळ वातावरण आणि विजेच्या लपंडावामुळे पारनेरकर हैराण

## तापमापकाचा पारा ३९ अंशावर

पारनेर : प्रतिनिधी

**उष्णतेचा तडाखा, सोमवारी संध्याकाळपासून कमी अधिक प्रमाणात असलेले ढगाळ वातावरण यामुळे पारनेरवासीय हैराण झाले आहेत.गेल्या पंधरा दिवसांपासून पारनेर परिसरात तापकामापकाचा पारा ३९ अंश सेल्सिअस पर्यंत पोहचला आहे.त्यातच पारनेर शहरात वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने उष्णतेमुळे नागरिक हैराण झाले आहेत.**



सोमवारी संध्याकाळी पाच वाजण्याच्या सुमारास ढगांचा गडगडाट व वादळी वाऱ्यासह पावसाने किरकोळ स्वरूपात हजेरी लावली. त्यामुळे उष्णतेत मोठी वाढ झाली. त्यातच वीज जवळपास एक तास खंडित झाला होता.वीज पुरवठा सुरू झाल्यावर पुन्हा दहा मिनिटांच्या अंतराने वारंवार वीज पुरवठा खंडित होत होता.पारनेर -कान्हूर पठार रस्त्यावर कान्हूर चौकात वडाच्या झाडाच्या फांद्या वीज वाहकतारांना घासत असल्याने वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याचे सांगण्यात आले.

वास्तविक पाहता उन्हाळ्यात सुटणारे वादळी वारे,अवकाळी पाऊस या बाबी लक्षात घेऊन वीज वितरण कंपनीने वीज तारांजवळील झाडांची छाटणी, किरकोळ दुरूस्ती करणे आवश्यक होते.तसेच नेहमीची देखभाल,दुरूस्ती वेळोवेळी होणे आवश्यक आहे.मात्र या गोष्टींकडे दुर्लक्ष होत असल्याने पावसाळी वातावरण तयार झाले की वीज वितरण कंपनीचे संबंधित अधिकारी व कर्मचारी वीज पुरवठा खंडित करतात.पावसाळ्यापूर्वी करण्यात येणारी देखभाल,दुरुस्ती वेळेत झाली तर किरकोळ पावसात वीज पुरवठा खंडित करण्याची वेळ येणार नाही.

मात्र तसे न करता खबरदारीचा उपाय असल्याचे सांगत किरकोळ स्वरूपाच्या पावसातही वीज पुरवठा खंडित केला जातो. त्यामुळे नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर हाल होतात. ढगाळ वातावरणात वीज पुरवठा खंडीत झाल्यास अस्थम्याचे रूग्ण, वृध्द नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते.वीज वितरण कंपनीने वीज वाहक तारा व इतर दुरूस्त्या करून अखंडित वीजपुरवठा करावा अशी मागणी होत आहे.

**वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी काळजी घेतली जाते.अवकाळी पावसामुळे वीज वितरण यंत्रणेत बिघाड झाल्यास वीज पुरवठा खंडित होतो.यापुढील काळात अगदीच तातडीच्या नसतील अश्या दुरूस्त्या दिवसातील ठराविक वेळी एकदाच करण्याचे नियोजन करण्यात येईल.त्यामुळे दुरूस्ती साठी वारंवार वीजपुरवठा खंडित करावा लागणार नाही. तसे नियोजन करण्यासाठी २२ एप्रिल रोजी अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक घेण्यात येईल. श्रीरंग हटावकर,उपकार्यकारी अभियंता,संचलन व सुव्यवस्था उपविभाग.**

**सहा महिन्यांपूर्वी पारनेर शहरापासून पाच किलोमीटर अंतरावर, पुणेवाडी येथे ३३ केव्हीए क्षमतेचे वीज उपकेंद्र कार्यान्वित झाले आहे. त्यामुळे उन्हाळ्यात विजेची मागणी वाढली तरी त्याचा परिणाम पारनेर व परिसरातील वीज पुरवठ्यावर होणार नाही अशी अपेक्षा होती.मात्र मागणीनुसार वीज मिळत असूनही वीज वितरण कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गलथानपणामुळे वीज ग्राहकांना त्रासाला सामोरे जावे लागत असल्याने संताप व्यक्त होत आहे.**

# अवकाळी पावसाने अळकुटी परिसराला झोडपले

## ■ आंबा,कांद्याच्या पिकाचे नुकसान ■ कळस येथे घरावरील पत्रे उडाले

निघोज : प्रतिनिधी

**तालुक्यातील अळकुटी परिसराला वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने झोडपले. या पावसामुळे आंबा तसेच कांद्याच्या पिकाचे मोठे नुकसान झाले. कळस येथे घरावरील पत्रे उडून गेल्याने शेतकऱ्यांचा संसार उघडयावर पडला.**

अळकुटी, कळस, रांधे, दरोडी या गावांमध्ये मंगळवारी दुपारी वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाला सुरूवात झाल्याने शेतामध्ये काढून ठेवलेल्या कांद्याचे मोठे नुकसान झाले. विविध भागांमधील अंब्याच्या फळांचेही नुकसान झाले. सरकारने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत करण्याची मागणी करण्यात येत आहे.

विजेच्या कडकडाटासह पाऊस सुरू झाल्याने शेतामध्ये उघडयावर पडलेला कांदा कागदाने झाकण्यासाठी शेतकऱ्यांची धांदल उडाली. अनेक ठिकाणी कांद्या झाकलेले कागद सोसाटयाच्या वाऱ्यामुळे उडून गेले.

वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसाने शेतकरी वर्गाची तारांबळ उडालेली असतानाच दुसरीकडे विजपुरवठा खंडीत झाला. दुपारच्या वेळी असलेले ३६ ते ३८ डिग्री तापमानामुळे नागरीक उकाडयाने त्रस्त होते. त्यातच वीज खंडीत झाल्याने नागरीकांच्या त्रासात अधिक भर पडली.



■ कळस येथील प्रशांत गाडगे या शेतकऱ्याच्या घरावरील पत्रे उडून गेल्यामुळे नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या वतीने त्यांना १५ हजार रूपयांची मदत तात्काळ देण्यात आली.

### लंके प्रतिष्ठानची १५ हजार मदत

**नीलेश लंके यांना या घटनेची माहीती मिळाल्यानंतर त्यांनी तात्काळ प्रशांत गाडगे यांना १५ हजार रूपयांची मदत देण्याची सुचना निर्मलग्राम कळस येथील प्रतिष्ठाणच्या कार्यकर्त्यांना दिली होती. लंके यांच्या सुचनेनुसार गाडगे यांच्याकडे १५ हजार रूपयांची मदत सुपूर्द करण्यात आली.**

### घरावरील पत्रे उडाले, वराळ यांची भेट

**कळस येथील प्रशांत चिमाजी गाडगे या शेतकऱ्याच्या घरावरील पत्रे उडाल्याने त्यांचा संसार उघडयावर पडला. संदीप पाटील वराळ जनसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष सचिन वराळ यांनी कळस येथे भेट देऊन गाडगे यांच्या घराच्या नुकसानीची पाहणी केली. खा. डॉ. सुजय विखे यांनाही या नुकसानीबाबत वराळ यांनी माहीती दिली. गाडगे यांना खा. डॉ. विखे यांच्यामार्फत शासनाकडून मदत मिळवून देण्याचे आश्वासन वराळ यांनी दिले.**

### कैऱ्यांचा सडा

**वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे बहारात आलेल्या आंब्याच्या फळांचे मोठे नुकसान झाले होते. झाडांखाली कैऱ्यांचा सडा पडला होता. सरकारने आंबा उत्पादक शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत करण्याची मागणी करण्यात येत आहे.**

# शनिवारी बाबुर्डीत रोकडेश्वराचा यात्रोत्सव

## शकुंतला नगरकर यांच्या लोकनाटयाचे आयोजन

सुपा : प्रतिनिधी

**तालुक्यातील बाबुर्डी येथील ग्रामदैवत, नवसाला पावणारे देवस्थान म्हणून प्रसिध्द असलेल्या श्री रोकडेश्वराच्या यात्रोत्सवास शनिवारपासून प्रारंभ होणार असल्याची माहीती सरपंच प्रकाश गुंड यांनी दिली.**



शनिवार दि.२० रोजी सकाळी ६ वाजता रोकडोबा महाराजांची महापुजा, अभिषेक, दुपारी ४ ते ५ देवाची पताका काठयांची मिरवणूक, सायंकाळी ५ ते ७ दंडवत व दर्शन सोहळा व त्याच दरम्यान शेरणी वाटपाचा कार्यक्रम होणार आहे. रात्री ७ ते ८.३० रोकडोबा महाराजांच्या पालखीची मिरवणूक, रात्री ८.३० ते १२.३० शकुंतला चव्हाण नगरकर यांच्या लोकनाटय तमाशाचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवार दि. २१ रोजी सकाळी ८ ते ११ दरम्यान हजेरीचा कार्यक्रम होणार असून सायंकाळी २.३० ते ६.दरम्यान कुस्त्यांच्या आखाडयाचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रेची तयारी पुर्ण झाली असून मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

येणाऱ्या भाविकांसाठी दर्शन रांगा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वाहन पार्कीगची व्यवस्था करण्यात आली असून भाविकांनी दर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन सरपंच प्रकाश गुंड यांच्यासह यात्रा कमिटी व बाबुर्डी ग्रामस्थ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### काय आहे अख्यायिका ?

**पुरातन काळात पळवे येथील भाविक अस्तगांवच्या डोंगरातून दगडी चाकाच्या गाडयामधून रोकडेश्वराची मुर्ती घेउन जात असताना गाडा बाबुर्डीत येऊन थांबला व ती मुर्ती त्याच जागेवर स्थिरावली. पुढे हीच मुर्ती मारूतीचा अवतार म्हणून प्रसिध्द झाली. भाविक मुर्तीची पुजा आर्चा करू लागले. देवस्थानास रोकडीया नाव पडले कारण श्रध्देनुसार नवस बोलल्यानंतर ही मुर्ती नवसाला पावते. अगदी रोकड पावते. म्हणून रोकडोबा हे नाव प्रचलित झाले. परंपरेनुसार गावात दुमजली घर वा घरावर कौल चढविले जात नाही.**

# राजकारण गेल मिशीत चित्रपट १९ एप्रिलपासून चित्रपटगृहात झळकणार

## ■ लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीत राजकारणावर मिश्किल भाष्य करणारा चित्रपट ■ पारनेरकरांचे चित्रपट निर्मिती क्षेत्रात पदार्पण

पारनेर : प्रतिनिधी

**राज्यातील दुग्ध व्यवसायात नावाजलेलेले व्यावसायिक मच्छिंद्र लंके आणि सुरेश पठारे यांच्या बकुळी क्रिएशन या निर्मिती संस्थेचा राजकारण गेल मिशीत हा मकरंद अनासपुरे यांची प्रमुख भूमिका व दिग्दर्शन असलेला मराठी चित्रपट १९ एप्रिलपासून महाराष्ट्रातील विविध चित्रपटगृहांमध्ये झळकणार आहे.**




जेष्ठ ग्रामीण लेखक रा.रं.बोराडे यांच्या अग अग मिशी या कथेवर राजकारण गेलं मिशीत या चित्रपटाची पटकथा बेतलेली आहे. सध्या देशात आणि राज्यात सुरू असलेल्या राजकारणावर मार्मिक आणि खुसखुशीत भाष्य या चित्रपटात करण्यात आले आहे.

लंके आणि पठारे यांच्यासह शिल्पा अनासपुरे,त्रिशला देशमाने या चित्रपटाच्या निर्मात्या आहेत.छाया दिग्दर्शन सुरेश देशमाने यांचे आहे. अतुल दिवे यांनी चित्रपटाला संगीत दिले आहे. कथाविस्तार व पटकथा संवाद योगेश शिरसाठ,सुमित तौर यांचे आहेत.संकलन अनंत कामथ यांनी केले आहे.प्रसिध्द अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्यासह प्राजक्ता हणमघर ,प्रकाश भागवत, डॉ .विजय देशमुख,डॉ. राजू सोनवणे, नितीन कुलकर्णी,बाळू मुकादम, प्रशांत जाधव,विनित भोंडे,हरीश तिवारी,छोटू विठ्ठल,श्वेता पारखे, उन्नती कांबळे,रेश्मा राठोड,सुनील डोंगरे,शैलेश रोकडे,विश्वनाथ कुलकर्णी,अनुपमा पाटील आदींनी या चित्रपटात भूमिका साकारल्या आहेत.

सध्या देशात लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने लोकशाहीचा उत्सव सुरू आहे.या वातावरणात राजकारण गेल मिशीत हा चित्रपट प्रेक्षकांना मनसोक्त हसवून विचार करायला लावणारा एक मार्मिक चित्रपट आहे.अभिनेते मकरंद अनासपुरे यांचे खुर्ची सम्राट,गल्लीत गोंधळ दिल्लीत मुजरा,पुन्हा गोंधळ पुन्हा मुजरा यासारखे राजकीय पार्श्वभूमी असलेले विनोदी चित्रपट गाजले आहेत .तसाच उत्कृष्ट प्रतिसाद या चित्रपटाला मिळेल याची खात्री मकरंद अनासपुरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी व्यक्त केली.प्रेक्षकांनी चित्रपटगृहात जाऊन, विनोदी आणि राजकीय स्थितीवर भाष्य करणारा हा चित्रपट पहावा असे आवाहन चित्रपटाचे निर्माते मंच्छिंद्र लंके व सुरेश पठारे यांनी केले आहे.

**राजकारण गेल मिशीत या चित्रपटाचे चित्रीकरण पारनेरसह तालुक्यातील जातेगाव, घाणेगाव या परिसरात झाले आहे.यापूर्वी १९८८ साली प्रसिद्ध अभिनेते नाना पाटेकर, दिप्ती नवल,निळू फुले यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या सुर्यास्त या प्रायोगिक मराठी चित्रपटाचे चित्रीकरण पारनेरसह तालुक्यातील सिध्देश्वरवाडी येथे झाले होते.**

**राजकारण गेल मिशीत या चित्रपटात आपल्या मातीतली कथा आजच्या राजकारणाशी जोडून मांडलेली आहे. ग्रामीण भागातील विषय आणि ग्रामीण भागातील कलाकार घेऊन चांगला चित्रपट करता येऊ शकतो का या प्रश्नाचे उत्तर आपण या चित्रपटातून दिले आहे. स्थानिक कलाकारांना वाव देण्यात आला आहे.त्याच्यांत पण कला आहे.मुंबईला येता येणार नसेल तर त्यांनी काम करायचे नाही का? आणि हे करताना एक चांगला चित्रपट ,एक चांगला प्रयोग महाराष्ट्रासमोर मांडण्याची माझी इच्छा आहे.या चित्रपटाला प्रेक्षकांनी चांगला प्रतिसाद दिला तर तरूण दिग्दर्शकाला प्रोत्साहन मिळेल. सुरेश पठारे आणि मच्छिंद्र लंके यांनी अगदी मनापासून सहकार्य केल्यामुळे चित्रपटात कोणत्याही उणिवा राहिल्या नाहीत.प्रेक्षकांनी मतदानाला जाण्यापूर्वी हा चित्रपट जरूर पहावा. ग्रामीण भागातील कलाकारांना प्रोत्साहन द्यावे.**

**मकरंद अनासपुरे,अभिनेते.**

# किन्ही-बहिरोबावाडीतील प्रगतशील शेतकरी हरबरा पिकाच्या उत्पादनात अव्वल

## राज्यस्तरीय स्पर्धेत जिल्ह्यात द्वितीय क्रमांक




किन्ही : प्रतिनिधी

**किन्ही-बहिरोबावाडी (ता. पारनेर) येथील प्रगतशील शेतकरी तथा माजी उत्कृष्ट फिरकी गोलंदाज शिवाजी देवराम खोडदे यांना महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागांतर्गत आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेत पारनेर तालुक्यातून हरबरा पिकासाठी प्रथम तर जिल्ह्यात द्वितीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले.**

खोडदे यांनी उत्कृष्ट पध्दतीने हरबराचे पिक घेऊन मिळवलेल्या यशाबद्दल उपविभागीय अधिकारी (श्रीगोंदा) गणेश राठोड यांच्या हस्ते त्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी अतिरिक्त तहसिलदार (श्रीगोंदा) गायत्री सौंदाणे उपस्थित होते.

पिक घेण्यासाठी त्यांना कृषी सहाय्यक सौ. बोरूडे यांचे मार्गदर्शन लाभले.शिवाजी खोडदे गावात प्रगतशील शेतकरी म्हणून प्रसिध्द असून, त्यांना आधुनिक शेतीच्या कामासाठी मुलगा अभिजीत खोडदे यांचे सहकार्य मिळत आहे. खोडदे परिवार शेतात नवनवीन दिशादर्शक प्रकल्प राबवून पिक घेत असतात. तर इतर शेतकरी वर्गाला देखील मार्गदर्शन करतात. खोडदे यांचे यावेळी ग्रामपंचायत सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते शेतकरी नेते अनिलराव देठे यांनी विशेष अभिनंदन केले.

# आईची नव्वदी मुलांनी केली वाजतगाजत साजरी !

## ■ गावातुन रथातून मिरवणूक, स्नेहभोजन ■ कान्हूर पठार मधील मुजावर कुटुंबाचा आदर्शवत उपक्रम

कान्हूर पठार : प्रतिनिधी

**मुलांना कष्टातुन शिकवल आज त्यांनी उद्योग क्षेत्रात मोठी प्रगती साधली यापेक्षा आईला आनंद वाटणारी वेगळी गोष्ट नाही मात्र मुलांनी त्यापुढे जात ज्या आईनी आपल्याला मोठ केल तिचे ऋण कधीही न फिटणारे आहेत मात्र तीचा ९० वा वाढदिवस ढोल ताशांच्या समवेत वाजतगाजत साजरी करत गावाला स्नेहभोजन देत गावातुन आईची रथावर मिरवणूक देखील काढली.**



याबाबत अधिक माहीती अशी की,कान्हूर पठार (ता.पारनेर) येथील रहीवाशी मात्र व्यवसाय निमित्त नाशिक येथे स्थायिक असणारे व सामाजिक कामात नेहमी अग्रेसर आसणारे मुजावर कुटुंबाने आईचा ९० वा वाढदिवस अनोख्या पध्दतीने साजरा करत समाजात वेगळा संदेश दिला आहे.आजकाल एकत्रित कुटुंब पध्दत लोप पावत चाली आसल्यामुळे वृध्दाश्रम संख्येत वाढ होत चाली आहे. मात्र यात अजुनही कुटुंब एकत्रित राहत आहेत. मुजावर कुटुंबातील सदस्य अब्बास मुजावर, हाजी मुजावर, हसन मुजावर, कासम मुजावर व रबिया मुजावर ही सर्व मुले उद्योग व्यवसायात नाशिक जिल्ह्यात अग्रेसर आहेत.

आपल्या आईचा जिन्नत हाजी मुजावर यांचा ९० वा वाढदिवस गावात साजरा करण्याचे ठरविले गावामध्ये बँड पथक, घोड्यावरील रथावर आईला बसवुन वाजतगाजत गावातुन मिरवणूक काढली गावकऱ्यांनी देखील आईचा आदर सत्कार करत पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या गावकऱ्यांसाठी मुजावर कुटुंबाने स्नेहभोजनाचे देखील आयोजन केले होते. या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाचे गावकऱ्यांनी तोंडभरून कौतुक केले.

यावेळी सरपंच संध्या ठुबे, गोकुळ काकडे, सागर व्यवहारे, शिवाजी व्यवहारे, सुधीर लोंढे, दत्तात्रय ठुबे, विजयकुमार ठुबे, कांतीलाल साळवे, डी.आर.ठुबे, कैलास लोंढे, नियाज इनामदार, एकनाथ ठुबे, गुलाब लोंढे, एस. एल. ठुबे, बाळासाहेब ठुबे, सुनिता वाळके, ज्ञानेश्वर ठुबे, सद्दाम इनामदार, भानुदास ठुबे, उपस्थित होते.

**एखाद्या स्त्री ची कितीही बिकट परिस्थितीत असेल मात्र तिने कष्ट करुन आपल्या मुलांना शिक्षण देत आपल्या पायावर उभे केले असे आमच्या आईचे व्यक्तिमत्व आहे हे इतरांना प्रेरणादायी ठरावे त्याकरता हा कार्यक्रम आयोजित केला तिचे ऋण कधीही न फिटणारे आहेत.**

**अब्बास मुजावर, उद्योजक**

# एन.एम.एम.एस. परीक्षेत साईनाथ हायस्कूलचे यश

## एन.एम.एम.एस. मध्ये ८ तर सारथी शिष्यवृत्तीत ५१ विद्यार्थी

अळकुटी : प्रतिनिधी

**येथील रयत शिक्षण संस्थेच्या साईनाथ हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाने राज्य शासनाच्या २०२३ व २४ या शैक्षणिक वर्षातील राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या मागास शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. यामध्ये एन.एम.एम. एस. शिष्यवृत्ती प्राप्त ८ विद्यार्थी तसेच सारथी शिष्यवृत्ती प्राप्त ५१ असे ५९ विद्यार्थी यशस्वी झाले असून या यशस्वी विद्यार्थ्यांना २३लाख ४२ हजार ४०० रुपये एवढी शिष्यवृत्ती मिळणार आहे.**



या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये एन.एम.एम.एस. शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी - डेरे मोरेश, व्हटकर आयुष, कु. जाधव संस्कृती, मूळ स्वयंम, डेरे आयुष, घोलप ओंकार, गिरी आयुष, वाघ गौरव आणि सारथी शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी - डेरे तनिष्का, शिरोळे सानवी, जगताप यश, मुळे रिया, पानमंद कार्तिक, चिकणे श्रावणी , पानमंद ओम भंडारी सौरव, मुळे समर्थ, म्हस्के सिद्धी, पावडे वैष्णवी, पडवळ ईश्वरी, पुंडे साई, भंडारी रोशनी बेलोटे आर्यन, थोरात करण, डेरे ईश्वरी, कापसे समृद्धी, डेरे आर्यन, वामन ऐश्वर्या, मुळे आरती, शेटे सानवी, गहाणडुले अनुष्का, उजगरे मुक्ता, येवले यश, खिलारी श्रेया, गोर्डे आर्या देशमुख तनिष्का, गोर्डे सार्थक हाडवळे आदित्य, शिरोळे ऋतुजा खडके सिमरन, आवारी ओम, भंडारी तनुजा, दाते तनिष्का, भोसले ओम मोरे शुभम, थोरात अनुष्का, तांबोळी कृष्णा, चौधरी समृद्धी, पानमंद मयुरी, म्हस्के कल्याणी, पुंडे तनिष्का, डेरे सार्थक, लामखडे श्रुष्टी, आवारी श्रावणी, कड आर्यन, गोरडे ईश्वरी, चौधरी तनिष्का, पुंडे अनुश, गावडे गौरव या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा समावेश असून त्यांना सामाजिक शास्त्र विभागाचे प्रमुख जाधव व्ही.पी, विज्ञान शिक्षिका सौ. शिंदे एम.जे, गणित शिक्षिका आंबरे एस.एस., बुद्धीमत्ता शिक्षिका श्रीमती कातोरे जी.एस यांचे मार्गदर्शन लाभले.

शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे रयतचे विभागीय अधिकारी तुकाराम कन्हेरकर, स्थानिक स्कुल समितीचे अध्यक्ष बाबाजी भंडारी, प्राचार्य मंगेश जाधव, पारनेर तालुका जैन संघटनेचे अध्यक्ष कुंदनकाका साखला, सरपंच डॉ. कोमल भंडारी, उपसरपंच बाळासाहेब धोत्रे, माजी चेअरमन बाळासाहेब पुंडे, अळकुटी पतसंस्थेचे अध्यक्ष महेश शिरोळे, संजय मते, माजी उपसरपंच आरिफ पटेल, उपमुख्याध्यापक शेळके, पर्यवेक्षिका सौ. मंगल शिंदे तसेच स्थानिक स्कूल कमिटी सदस्य व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com